# Chapter-39

# ठुमरी शैली व भाव: ऐतिहासिक विश्लेषण

**Dr. Yogini B. Sontakke**
Dept. of music,Late. Chhaganlal Mulji bhai Kadhi Kala Mahavidyalay, Achalpur camp, Paratwada.Dist Amravati Maharashtra
**Email:**-yogini1975@gmail.com

**सारांश:-**

आपण भावनाप्रधान अशा भारतीय संगीताचा वारसा जपतो असे म्हणतात कि जिथे शब्द थांबतात तिथे स्वरांमध्ये गुंफलेले शब्द आपल्या भावना प्रगट करतात. श्रोतृवृंदांच हृदय स्पर्शतात. या संगीतामध्ये उत्तर भारतीय संगीताची अत्यंत लोकप्रिय शैली मोडते ती म्हणजे 'ठुमरी'. ठुमरी गायकी मध्ये भाव प्रमुख असतो. रागांच्या कठोर नियमांचे बंधन न बाळगता शब्दांच्या भावनांना विविध स्वर अलंकारांनी सजवून शब्दांचा उठाव स्वरांचा ठेहेराव गमक, मींड, लयकारी, जमजमा अश्या तऱ्हेनी नटलेली हि ठुमरी भक्ती व श्रुंगार रस प्रधान आहे.

**प्रस्तावना:-**

उपशास्त्रीय संगीतात ठुमरी हा गीत प्रकार जरी मोडला जातो तरी शास्त्रीय व लोकसंगीताला जोडणारी ठुमरी संगीत रसिकांना जणु अपरिचीत अनभिज्ञ आहे. कारण शास्त्रीय गायनातील अरूची कलाकार आपल्या स्वतंत्र्य गायन प्रदर्शन मध्ये ख्याल गायील्यावर ठुमरी च्या स्थानी सभेमध्ये शेवटी भजन गायन करतात. ठुमरी शैली मध्ये रागांच्या शुध्दतेवर विशेष जोर नसतो.

नवाब वाजिद अली शाह यांच्या समया पासुन ठुमरी चे अस्तित्व लखनऊ मध्ये पाहिले गेले. कालांतराने हि शैली बनारस मध्ये पोहचून इतकी प्रचलीत झाली कि वर्तमानात हि पुर्व (पुरब) अंगाची ठुमरी एकमात्र प्रतिनिधि समजल्या गेली. त्यानंतर पंजाबी लोकसंगीताने प्रभावित होऊन नावीण्य स्वरुपे पंजाबी अंगाची शैली हि ठुमरी ओळखल्या गेली.

संगीतामध्ये भाव - संगीत ते मानले जाते जे कुठल्याही शास्त्रीय नियमात न बंधता हृदयातील भाव जसे - प्रेम, विरह, भक्ती, आनंद, दु:ख यांना स्वर व लयीच्या माध्यमाने अभिव्यक्त करते. ज्याचा मुख्य उद्देश्य रसीकांना भावनात्मक स्वरूपे एकरूप करणे त्या भावना स्पर्शाने, आणि या मध्येच भजन, लोकगीत, गजल, ठुमरी, चित्रपटगीत अशे प्रकार येतात. गायक आपल्या गायकीतून या भावनांद्वारे श्रोतृसमुदायास मंत्रमुग्ध करतो, हसवतो, रडवतो हेच भाव - संगीत ठुमरी गायन शैलीमध्ये कशाप्रकारे दिसते ते आपणास पाहता येईल.

**ठुमरी मध्ये भाव:-**

ठुमरी मध्ये भाव संगीत रस रंग आणि भावनांची प्रधानता (आनंद, दु:ख, प्रेम, विरह) या मध्ये रागांच्या शुध्दते पेक्षा शब्दांचा अर्थ आणि भावना यांना स्वरांद्वारे व्यक्त करणे. ठुमरी चा मुख्य उद्देश्य गायकाचा आवाज लय, गती आणि ठेहेराव द्वारा गीतामधील भावनांना जीवंत करणे. जणू ऐकणाऱ्यास एखादी कहाणी दृष्टीस पडावी. श्रृंगार रस ची प्रधानता घेऊन हि ठुमरी विशेषत: राधा - कृष्ण यांच्या प्रेमलीलांवर, मानवीय प्रेम - विरह प्रसंगावर आधारलेली असते. ज्यामध्ये श्रृंगार रस प्रामुख्याने दिसतो. ठुमरी मध्ये शब्दांचा अर्थपूर्ण प्रयोग केला जातो. एक- एका शब्दांच्या भावनांना स्वरांद्वारे हृदयस्पर्शी साकारतात तो भाव ऐकणाऱ्यास जाणवतो. ठुमरी मध्ये रागांच्या शुध्दते पेक्षा जास्त महत्व भाव सुंदरतेला दिला जातो. म्हणून एका रागातून दुसऱ्या रागात जाण्यास गायक मुक्त असतो अशी रागांच्या मिश्र स्वरूपाने ठुमरी अधीकच मधुर - गोड ऐकावयास मिळते.

थोडक्यात सांगायचे झाले तर ठुमरी संगीताचे असे स्वरूप आहे. जिथे काय गायीले (शब्द) आणि ते कसे गायीले (भाव / अंदाज) दोन्हींचे अचुक संतुलन होय. आणि ही शास्त्रीय संगीताच्या गंभीरतेला सोडून संगीतातील एक सोपी आणि भावनात्मक प्रस्तुती आहे.

**ऐतिहासिक विश्लेषण:-**

सुरवातीला ठुमरी चा विकास एक नृत्य गीत स्वरुपी झाला. लखनऊचे अंतिम नवाब वाजीद अली शाह (1847-1856 ई.) एक विलक्षण कला प्रेमी होते. त्यांच्याच प्रोत्साहनाने लखनऊ च्या दरबारात कत्थक नृत्या सोबत ठुमरी चा विशेष प्रयोग सुरू झाला. नृत्यामध्ये गीताचे शब्द व भावना याचे महत्व असते. त्याच कारणाने ही ठुमरी 'बंदिश' स्वरूपात गायीली गेली व बंदीशीची ठुमरी म्हटल्या जाऊ लागली.

लखनवी ठुमरी बोल- बॉट ची ठुमरी होती. याची रचना मध्यलयीन ख्याल समान सुगठीत असते. बंदिश स्पष्ट शब्दोच्चार सहित भावपूर्वक गायीली जाते. ही विशेषता विविध लयकारी सहित स्वर-बध्द बोल विस्तार, गीतांच्या छोटया-छोटया बोलांना लहान तिहायी तालाच्या लयीत नटवून भावपूर्ण गायन करणे हिच ठुमरीची विशेषता. बंदिशी ठुमरी चे रचना करणाऱ्यांमध्ये बिंदादीन, सनद पिया, कदर पिया, कलिका दिल, दरस पिया, चाँद पिया इ. नावे घेतली जातात.

नवाब वाजिद अली शाह यांनी स्वयं ' अख्तर पिया' नावाने ठुमरी ची रचना केली. बोल- बॉट ठुमरी मध्ये पण धृपद ची लयकारी व टप्पा अंग दिसून येतात. जे कित्येक कत्थक कलाकार

गातात. त्रिताल, पंजाबी, अंध्दा, जास्तित जास्त या ठुमरी मध्ये उपयोगितात कधी- कधी झपताल, आडा चौताल मध्ये निबध्द ठुमरी ची रचना दृष्टीस येतात, पण त्यांची संख्या खुपच कमी आहे.

**शैली :-**

लखनवी ठुमरी च्या शैली मध्ये ब्रजभाषा व अवधी, उर्दु भाषेचा प्रभाव होता. या ठुमरी मध्ये विलासतेचा प्रभाव दिसतो. लखनऊ च्या प्रसिध्द गायीका शमीम बानो यांचे ठुमरी विषयी असे म्हणने आहे कि " पुरब अंग की गायकी में ' फुरक - मुरक ' की ऐसी फबन होती थी कि सुनने वाले ' फडक - फडक ' उठते थे"

बेगम अख्तर यांचे गायन लखनवी शैलीशी प्रभावित होते. त्या आपल्या ठुमरी मध्ये उर्दु भाषेतील ' शेर' बोलीत असत त्यांची ठुमरी गजल गायकीशी प्रभावित. अशी ठुमरी शब्दांचा उच्चार, अंदाज वर विशेष जोर दयायच्या असे म्हणतात कि कालका प्रसाद लखनऊ वरून ठुमरीची शैली बनारस घेऊन गेलोत मग तीथल्या नर्तकींद्वारा (तवायफ) याचा प्रचार झाला  त्यावर लोकधुन, बोली यांचा प्रभाव, फलस्वरूप तेथील विशेषता घेऊन ठुमरीस लखनवी शैलीच्या वेगळे असे रुप आले या ठुमरीवर पुर्वी, उत्तर लोकगीतांचा प्रभाव खुप पडला. त्या कारणाने ठुमरी शैलीमध्ये सादगी व सरळ सोपी अशी दिसली.

सुप्रसिध्द गायीका गिरिजा देवी यांच्या शब्दात- " काशी की ठुमरी में ग्रामीण सौदर्य है जो वास्तवीक सौंदर्य है। इसमे बहुत लगाव, बझाव, खटर - पटर कुछ नही है बडी शांत और सीधे भाव की है। "

बनारस ठुमरी अतिशय हृदयस्पर्शी होती. या शैलीच्या कलाकारांमध्ये - बडे रामदास, भोलानाथ भट्ट, बडी मोतीबाई, महादेव प्रसाद मिश्र, सिध्देश्वरी देवी, विद्यार्थी गौहरजान, रसुलन बाई, बागेश्वरी देवी, गिरिजा देवी, पूर्णिमा चौधरी इ. नावे प्रमुख आहेत.  महादेव प्रसाद मिश्र लखनवी व बनारसी या दोन्ही शैलीच्या ठुमरी गात असत. त्यांना ठुमरी सम्राट म्हणत. गाते वेळी ठुमरीच्या एकाच शब्दाचे भाव ते सहज वेग - वेगळे भावनात प्रदर्शित करीत असत. हे आताच्या काळात खुप कमी दिसते. त्याच प्रकारे ठुमरी गायनात बडी मोती बाई यांची गायकी पारम्पारिक, विविधतापूर्ण आणि लालित्यपूर्ण होती त्याचा लयीतील समतोल प्रशंसनीय होता.

लखनवी ठुमरीची शैली बनारस गेली पण कालांतराने उत्तर भारतीय संगीतात ' बनारसी ठुमरी' चे प्रचलन इतके वाढले कि वर्तमान ती पुर्व अंग ची ठुमरीची एकमात्र प्रतिनीधी समजल्या गेली.

अशा प्रकारे भाषे नुसार ठुमरीचे स्वरुप भाव, ढंग व नवीन शैलीत स्वतंत्र अस्तित्व निर्माण झाले. त्यामध्ये 'पंजाब अंग' च्या ठुमरी चे स्वरुप निर्मिनारे प्रमुख गायक जे कसूर चे अली बख्श यांना

श्रेय दिले जाते.' पंजाब अंग' ठुमरी चे नाव घेतल्यास ध्यानात येते कि ' उस्ताद बडे गुलामअली खाँ ' चे मानने होते कि पंजाब मध्ये ठुमरी कधीच संगीतच्या विशिष्ट स्वरूपात कधीही विकसीत झाली नाही. ती परम्परागत रूपी पुरब शैली चीच ठुमरी गायीली गेली हे ही म्हणू शकतो कि पुरब अंगची ठुमरी मध्ये पंजाबी लोकसंगीत चा रंग देऊन वैचित्र्यपुर्ण बनवून गायील्याने त्यास ' पंजाब अंग' ची ठुमरी म्हटल्या गेले.

एक युग होते जेव्हा ठुमरी च्या विशिष्टय शैलीस रसुलन बाई, सिध्देश्वरी देवी, बेगम अख्तर या कलाकारांनी समृध्द व लोकप्रिय केली होती. पण वर्तमानात विशुध्द ठुमरी गायन चे कलाकार कमीच राहीलेत. शैलीचा जर विचार केल्यात आजचे कलाकार पुरब - अंगची बोल - बलाव ची ठुमरी गातात. ' पंजाब अंग ' च्या ठुमरी ची तर स्मृतीच होऊन राहिली आहे. रस,रंग आणि भावनांनी ओतप्रोत (प्रधानतेची) घेऊन स्वरूप, स्वर रंग सुंदर नटलेली हि ठुमरी गायकी त्याच लावण्याने या युगात प्रसिध्दीस यावी.

**निष्कर्ष :-**

शब्दांचा भाव कोणता स्पष्ट व्हावा किंवा करावा हे प्राविण्य गायकास प्राप्त असते. आपल्या गायकीच्या कौशल्यपूर्ण स्वरांच्या वेग- वेगळया सुरावटी अतिशय नजाकतीने गायक प्रस्तूत करू शकतो. आजही ठुमरी तितकीच लोकप्रिय आहे. ठुमरी गायन शैली अतिशय मधुर, गोड पण वैशिष्टयपूर्ण आहे. ही विचार, कल्पना व कल्पकतेची गायन शैली आहे. जी स्वरांच्या माध्यमातून शब्दांना भावनिक आकार देते. ठुमरीची कोमलता सहजता आणि भावनिकता श्रोत्यांच्या मनाला स्पर्श करते. शास्त्रीय संगीताची सखोल जान नसलेला श्रोता देखील ठुमरीतील भावांशी सहजपणे जोडला जातो. त्यामुळे ठुमरी ही शास्त्रीय व उपशास्त्रीय संगीतामधील एक महत्वाचा दुवा ठरते. तिची भावप्रधान शैली शास्त्रीय संगीताला अधिक सुलभ व लोकाभिमुख बनवते. भारतीय संगीत परंपरेत भावाभिव्यक्तीला ठुमरी मुळेच महत्वप्राप्त झाले आहे. आजच्या आधुनिकसंगीत प्रवाहात ही त्याचे प्रतिबिंब प्रतित होते आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची**

1. संगीत मीमांसा - डॉ. श्रीमती मृदुला पुरी, सत्य पब्लिशिंग हाऊस (नईदिल्ली) 110059
2. ठुमरी एक गान विधा - डॉ. चित्रा मोडक (विजय प्रकाशन)
3. बंदिश कि ठुमरीयाँ - पं. गंगाधर तेलंग संस्कार प्रकाशन मुंबई.
4. ठुमरी शैली और उसकी यात्रा - चारुशर्मा (शोधछात्र संगीत विभाग पंजाब विश्वविद्यालय)